शासकीय परिवहन सेवा, मुंबई या कार्यालयामार्फत खाजगी पुरवठादारांकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांचे दर करार निश्चित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. शापसे-३४१९/प्र.क्र.०३/का.३१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ३० मे, २०१९

<u>वाचा:-</u>

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शापसे-१०११ .क्र.प्र/१५५३१/, दिनांक ३०.०६.२०११.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शापसे३४१-८ .क्र.प्र/०८३१/, दिनांक .०३.०४.२०१८
३. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा यांचे पत्र क्र.शापसे/वा.वि./२०१९/११७५, दि.२६.०४.२०१९

<u>प्रस्तावना:-</u>

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्याकडून अति व अति महत्वाच्या राज्य अतिथींच्या परिवहन व्यवस्थेसाठी, शासकीय वाहने उपलब्ध नसताना खाजगी पुरवठादारांकडून भाडयाने वाहने उपलब्ध करून घेण्यात येतात. सदर दरकरार दि.३१.०३.२०१९ रोजी संपुष्टात आले आहेत. त्यानंतर भाडेतत्वावर वाहने घेण्यासाठी अशा वाहनांचे दरकरार करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने प्राप्त निविदांचे संदर्भ क्र. १ च्या दिनांक ३०.०६.२०११ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीमार्फत छाननी करण्यात आली. छाननी अंती वाहन पुरवठयासंदर्भातील विविध टप्प्याचे कमीत कमी दर अंतिमत: निश्चित करण्यात आले छाननीअंती समितीची शिफारस नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी संदर्भाधिन क्र. ३ अन्वये शासनास सादर केली. या निश्चित करण्यात आलेल्या दरांना मान्यता देण्याची व या दराने जे खाजगी पुरवठादार वाहने पुरविण्यास तयार असतील त्या पुरवठादारांचे नामिका (Panel) शासन मान्य पुरवठादार म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांचेकडून मुंबईस भेट देणाऱ्या सन्माननीय अतिथींच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय वाहने उपलब्ध नसताना खाजगी पुरवठादारांकडून भाडयाने वाहने उपलब्ध करून घेण्यासाठी सोबतच्या **विवरणपत्र- अ** मधील दरास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या दराने तसेच निविदेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून खालील पुरवठादारांकडून वाहने उपलब्ध करून घेण्यासही या शासन निर्णयान्वये, शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	वाहन पुरवठादाराचे नांव व पत्ता	दूरध्वनी क्रमांक
१.	**मे. सुलभा ट्रॅव्हल्स, मुंबई** १०, मॅजेस्टिक शॉपिंग सेंटर, जे. एस. एस. रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४.	०२२-२३८९००६२, २३८५०७८०, भ्रमणध्वनी क्र. ९८२१४७०३२२.
२	**मे. नितीन ट्रॅव्हल्स, मुंबई** शॉप नं. ४१, न्यू शॉपिंग सेंटर, गर्व्हमेंट कॉलनी, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.	**०२२-२३८८२२९९,** भ्रमणध्वनी क्र. ९९२०११२२३३, e mail- ०१nitintravels@gmail.com

३	**मे. ए. बी. ट्रॅव्हल्स, मुंबई** ६-अे, शॉप नं.१, दामोदर पार्क, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर, (पश्चिम) मुंबई-४०० ०८६.	०२२-२५००८८५५, भ्रमणध्वनी क्र. ९८२०१४८५८, e-mail- info@abcabs.co.in
४	**मे. संजय ट्रॅव्हल्स, मुंबई** १०१ पुजा रेसिडन्सी प्लॉट नं. ७७ शेर अ पंजाब को. ऑ. हौ. सो. अंधेरी (पूर्व, मुंबई -४०० ०६९.	०२२-२३५३०२९१, २३५३०२९२ भ्रमणध्वनी क्र. ९८६९०८१४७८ e-mail- sanjaaytravels@vsnl.net
५	**मे. विजय ट्रॅव्हल्स, मुंबई** शॉप नं.३, पारसमणी बिल्डींग, न्यु मानेकलाल इस्टेट, नरसी मेहता रोड, घाटकोपर, (पश्चिम) मुंबई-४०० ०८६.	०२२-२५१४६७६७, ०२२-२५१४१९६९, भ्रमणध्वनी क्र. e mail- vijaytravelsbokking८२ @gmail.com
६	**मे. इको (इंडिया) मोबॅलिटी अँड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. मुंबई** श्री बालाजी ॲटोमोबाईल्स, ११/सर्व्हिस रोड, सदानंद हॉटेल जवळ, सुभाष नगर, वाय कॉलनीच्या पाठीमागे, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१.	भ्रमणध्वनी क्र. ८८७९३९९६६९e e-mail- abhishek@ecorentacar.com

२. खाजगी पुरवठादाराकडून भाडयाने वाहने घेण्यासंदर्भात नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी-

१) निविदा सूचनांमधील अटी व शर्तींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील दर मान्य असलेल्या उपरोक्त पुरवठादारांबरोबर वाहन पुरवठयाबाबतचा आवश्यक तो दरकरार तात्काळ करून घेण्यात यावा. तसेच निविदेतील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे.

२) **सदर दरकरार दिनांक ०१/०६/२०१९ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी (दि.०१.०६.२०१९ ते दि. ३१.०५.२०२० पर्यंत) अंमलात राहील.**

३) सदर दर करारामध्ये कोणतेही बदल वा सुधारणा करण्याचे अधिकार अंतिमत: शासनाचे राहतील.

४) खाजगी वाहने भाडयाने उपलब्ध करून घ्यावयाची झाल्यास नियंत्रकांनी वरील शासनमान्य पुरवठादारांकडूनच वाहने उपलब्ध करून घ्यावीत. पाचही पुरवठादारांना समान न्यायाने भाडयाने वाहने उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात यावे. जर एखाद्या पुरवठादाराने त्या दिवशी वाहने पुरविण्यास असमर्थता दर्शविली तर तसे त्या पुरवठादाराकडून लेखी घेण्यात यावे व त्याची प्रत बिलासोबत सादर करावी.

५) उपरोक्त सर्व पुरवठादारांनी विविक्षित परिस्थितीत / अपरिहार्य कारणास्तव वाहने पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत शासनमान्य दराने अन्य

पुरवठादाराकडून वाहन उपलब्ध करून घेण्यास नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

६) वाहन पुरवठा केल्यानंतर त्याबाबतची देयके पुरवठादरांना ३ महिन्याच्य आत अदा करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी वाहने भाडयाने घेतल्यानंतर नियंत्रकांनी वाहन पुरवठयाबाबतची देयके तात्काळ प्राप्त करून ती आपल्या शिफारशीसह ३० दिवसाच्या आत न चुकता शासनास सादर करावीत.

७) संबधित पुरवठादारांनी वाहनाचा पुरवठा केल्यानंतर त्याबाबतचे देयके तात्काळ नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, किंवा संबंधित मागणीदारास अदा करण्यासाठी सादर करावीत.

८) राज्य शासनाच्या अन्य प्रशासकीय विभागांना त्यांच्या आवश्यकतेनुसार वाहने खाजगी पुरवठादारांकडून भाडयाने घ्यावयाची असल्यास, त्यांनी परस्पर संबंधित पुरवठादारांकडून विवरणपत्रातील दरानुसार वाहने उपलब्ध करून घ्यावीत. त्यावरील खर्च संबधित प्रशासकीय विभागाने त्यांच्याकडील तरतूदींतून भागवावा. सदर खर्चाची देयके शासकीय परिवहन सेवा कार्यालयाकडून प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही. यासाठी शासकीय परिवहन सेवा कार्यालयाशी अनावश्यक पत्रव्यवहार किंवा मागणीपत्र करू नये.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०५३०१६२११६०४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2019.05.30 16:28:03 +05'30'

(अ.भि.मोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- विवरणपत्र अ

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा. प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई
३. उपसचिव (राजशिष्टाचार) तथा संचालक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई
४. उप सचिव व उप मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग/का.३१, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,
७. उप सचिव वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई

८. उप सचिव, उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

९. परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, वांद्रे (पूर्व) मुंबई

१०. खाजगी सचिव, मा. मंत्री राजशिष्टाचार यांचे कार्यलय, मंत्रालय, मुंबई

११. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई

१२. मे. नितीन ट्रॅव्हल्स, मुंबई, शॉप नं. ४१, न्यू शॉपिंग सेंटर, गर्व्हमेंट कॉलनी, बांद्रा (पूर्व), मुंबई-

१३. मे. ए. बी. ट्रॅव्हल्स, ६-अे, शॉप नं.१, दामोदर पार्क, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर, (पश्चिम) मुंबई-

१४. मे. संजय ट्रॅव्हल्स, १०१ पुजा रेसिडन्सी प्लॉट नं. ७७ शेर अ पंजाब को. ऑ. हौ. सो. अंधेरी (पूर्व), मुंबई -४०० ०६९.

१५. मे. सुलभा ट्रॅव्हल्स, १०, मॅजेस्टिक शॉपिंग सेंटर, जे.एस. एस. रोड, मुंबई ४०० ००४

१६. मे. इको (इंडिया) मोबॅलिटी अँड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. मुंबई

१७. निवडनस्ती.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. शापसे-३४१९/प्र.क्र. ०३/३१, दिनांक- ३० मे, २०१९ चे विवरणपत्र-अ (भाडोत्री वाहन पुरविण्याचे न्युनतम दर दर्शविणारा तक्ता)

Sr. No.	Vehical Type	४ Hours & ४० K.M.	८ Hours & ८० K.M.	१२ Hours & १२० K.M.	२४ Hours & २४० Km	Per Hours	Per K.M.	३०/३१ Days २००० K.M. (Minimum १२ Hr / Day Duty)
१	XCENT	१,०५०	१,४७५	२,३८०	४,७००	९५	१५	४८,०००
२	SWIFT DZIRE	१,०५०	१,४७५	२,३८०	४,७००	९५	१५	४८,०००
३	HONDA AMAZE	१,०५०	१,४७५	२,३८०	४,७००	९५	१५	४८,०००
४	TOYOTA ETIOS	१,१००	१,६२०	२,६००	५,२४५	१००	१६	५२,०००
५	SCORPIO A/C	१,५००	२,०००	३,०००	४,०००	१२५	१४	६२,०००
६	MARUTI SUZUKI ERTIGA	१,५००	२,१४०	३,०००	४,७९०	१२५	१४	६५,०००
७	HONDA CITY	१,६००	२,३००	३,६००	५,६९०	१५०	२४	७५,०००
८	MARUTI SUZUKI CIAZ	१,६००	२,३००	३,६००	५,६९०	१५०	२४	७५,०००
९	NISSAN SUNNY	१,६००	२,३००	३,६००	५,६९०	१५०	२४	७५,०००
१०	TOYOTA INNOVA	१,६००	२,३५०	३,६००	५,२००	१५०	१६	७५,०००
११	TOYOTA INNOVA CRYSTA	१,६००	२,५८५	३,६००	५,२००	१६५	१६	८२,५००
१२	TOYOTA CORELA ALTIS	२,२५०	३,०००	५,२००	९,०००	२५०	३०	९०,०००
१३	TOYOTA FORTUNER	३,९००	५,०००	७,५००	११,५००	४००	५०	१,५०,०००
१४	MERCEDEZ E-CLASS	५,०००	८,०००	९,०००	२५,०००	५००	५५	१,७५,०००
१५	JAGWAR	६,०००	९,०००	१०,०००	२४,३००	५००	५५	१,७५,०००
१६	TEMPO TRAVELLER	५,५००	७,५००	११,०००	१४,०००	४००	२२	१,६०,०००
१७	MINI BUS १३/१७ SEATER	६,०००	८,०००	१३,०००	१६,०००	४००	२५	१,७५,०००
१८	MINI BUS २०/२५ SEATER	६,५००	८,५००	१४,०००	१७,०००	४००	३०	२,००,०००
१९	BUS ३५ SEATER	८,०००	१२,५००	१८,०००	२१,०००	७५०	६५	२,१५,०००
२०	BUS ४४ SEATER	८,५००	१३,०००	१९,०००	२२,०००	८००	७०	२,२५,०००
२१	SML ९/१३ SEATER	७,३००	१०,०००	१५,०००	२०,०००	४००	२५	२,३०,०००

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2019.05.30 16:29:07 +05'30'

(अ.भि.मोरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन